# सिंहस्थाच्या भाऊगर्दीत टाकळीचा मठ रंगरंगोटीला महाग

विनोद बेदरकर : सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २७ : सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कोट्यवधीच्या विकासकामांत दूरदूरच्या धार्मिक स्थळांवर कोट्यवधीचा खर्च होत असताना जिल्ह्यातील अनेक मठ, समाधिस्थळांची मात्र उपेक्षा सुरूच आहे. त्र्यंबकेश्वरच्या निवृत्तिनाथ महाराज समाधिस्थळाप्रमाणे आगरटाकळीला समर्थ रामदास स्वामींची तपोभूमी असलेला मठ मात्र रंगरंगोटीला महाग आहे.

दोन आमदारांचा राबता असलेल्या या मठाच्या परिसरात प्रशासनाने गोदावरी-टाकळी संगमावर नवीन घाट बांधून लाखो भाविकांच्या स्नानाची सोय केली. पण हेच भाविक टाकळी संगमावर स्नान करून समर्थांच्या मठात दर्शनाला आले तर त्यांना तेच जीर्ण व रंगरंगोटी नसलेल्या मठाचेच दर्शन होणार आहे. तब्बल वर्षापासून पाठपुरावा करणाऱ्या विश्वस्त मंडळाची शासन आणि प्रशासनाकडूनही उपेक्षा




सुरूच आहे.

### 'वर्क ऑर्डर'च नाही

कामासाठी दहा लाख मंजूर झाले. दोघा ठेकेदारांना काम देण्याची औपचारिक चर्चाही झाली; पण प्रकरण 'वर्क ऑर्डर'साठी आडले, त्यानंतर महापौर बदलले. नवे आयुक्त आले. खास सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी म्हणून मुख्यमंत्र्यांच्या मर्जीतील आलेल्या आयुक्तांच्या एन्ट्रीनंतर सिंहस्थ कामाला गती येईल, ही अपेक्षा होती. त्यासाठी आमदार बाळासाहेब सानप, प्रा. देवयानी फरांदे यांच्याकडे मठातर्फे अनेकदा पाठपुरावा झाला; पण अद्याप मुहूर्त मिळाला नाही.

### प्रशासकीय भूमिकेवर शंका

**एकीकडे सर्वत्र सिंहस्थ कुंभमेळ्याची कामे जोरात सुरू असताना टाकळी मठ मंदिराच्या कोट्यवधी मूल्यांच्या जमिनीच्या अल्प दरात विल्हेवाटीच्या प्रकारातून गुन्हे दाखल होण्याच्या दिशेने सुरू असलेली वाटचाल बघता, सिंहस्थात स्थानिक पौराणिक संस्थांबाबत प्रशासकीय भूमिकेविषयी प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.**

### स्नानाला घाट, मठाला रंगही नाही

आगरटाकळीला नंदिनी संगमावर दासबोधाची निर्मिती करणाऱ्या समर्थ रामदास स्वामींचा मठ आहे. चारेशहून अधिक वर्षांचा इतिहास असलेल्या या मठापासून काही अंतरावर गोदावरी व नंदिनी नदीचा संगम होतो. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दोन हजार ३७८ कोटींच्या नियोजनात प्रशासनाने प्रथमच गोदावरी-नंदिनी संगमावर घाट बांधला आहे. नंदिनी नदीचे पात्र बदलून बांधलेल्या या घाटावर औरंगाबाद आणि धुळे मार्गाने येणाऱ्या लाखो भाविकांच्या स्नानाची सोय होणार आहे. साधारण सव्वाचार लाख भाविकांना टाकळी संगमावर शाहीस्नान घडविण्याचे नियोजन अंतिम टप्प्यात आले आहे. मात्र, संगमावर सिंहस्थ स्नानानंतर याच लाखो भाविकांपैकी काहींनी टाकळी येथील समर्थांचा मठ पाहायची इच्छा व्यक्त केली तर, त्यांना प्रदूषित नाले सोडलेल्या नंदिनीशिवाय कसलेच दर्शन होणार नाही.